SYMBIOSIS COLLEGE OF ARTS & COMMERCE
An Autonomous College | Under Savitribai Phule Pune University
Reaccredited 'A+' with 3.51 CGPA for Third Cycle By NAAC | College with Potential for Excellence

## "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना"

# उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२२-२३ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी पदवीत्तर पदविका, पदवीत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Time Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking 200 च्या आत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल, अशा विद्यार्थ्यांकरिता शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र. २१८/ तांशी- ४, दि. ०४.१०.२०१८, क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र. ११६/ तांशी- ४, दि. ०६ सप्टेंबर, २०१८, शासन शुद्धिपत्र क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. २७४ (भाग- २)/ तांशी- ४, दि. २२ मार्च, २०२२ व शासन पत्र क्रमांक पशियो- २०२२/ प्र. क्र. १०८/ तांशी- ४, दि. ३ जून, २०२२ नुसार सदर शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येत आहे.

या शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा/ अभ्यासक्रम निहाय जागा उपलब्ध असतील.

| अ.क्र. | शाखा/ अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदविका / पदव्युत्तर पदवी | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | कला | ०१ | ०१ | ०२ |
| २. | वाणिज्य | ०१ | ०१ | ०२ |

अटी :

१) उमेदवार व उमेदवाराचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असणे आवश्यक आहे.

२) शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्ययावत (सन २०२२ मधील) THE (Time Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking 200 च्या आत असणे बंधनकारक आहे.

३) उमेदवाराच्या पालकांचे / कुटुंबांचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरून सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२१-२०२२ मधील एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.

४) इच्छुक विद्यार्थ्यांनी **https://foreignscholarship2022.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरावा व ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतीसह पडताळणीसाठी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालयात वेळापत्रकानुसार सादर करावीत.

५) या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अहर्ता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपद्धती इत्यादी माहिती करिता **https://dte.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर आवश्यक ते शासन निर्णय उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तसेच सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये व सहसंचालक, उच्च शिक्षण विभागीय कार्यालये यांची यादीही संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सौ. गंधाली परुळेकर

प्रबंधक
REGISTRAR
Symbiosis College of
Arts & Commerce, Pune-4.

CS Scanned with CamScanner